

College Code : 3176

SWAMI VIVEKANAND EDUCATION & RURAL DEVELOPMENT CHARITABLE TRUST, SHRIGONDA

SWAMI VIVEKANAND AYURVED MEDICAL COLLEGE

A/P – Pargaon Sk, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar. Pin – 413702

svayurvedcollege@gmail.com www.svct-shrigonda.com 9819680012

Outward No. :

Date :

**ANNEXURE- III**

# Trust Details

**Faculty. Ayurved**

**Name of College/Institute.** Swami Vivekanand Ayurved Medical College and Research Center

| | |
|---|---|
| Name of Trust / Society | Swami Vivekanand Education And Rural Development Charitable Trust |
| Registration Certificate | Trust / Society Society :- F/4680/Ahmednagar<br>Hospital (Bombay Nursing Act) :- AH 433 |
| Name of the College/ Institute (As per First Affiliation letter) | Swami Vivekanand Ayurved Medical College and Research Center |
| Address | A/P - Pargaon Sudrik Tal- Shrigond a Dist- Ahmednagar Pin- 413702 |
| Email ID | svayurvedcollege@gmail.com |
| Telephone / Mobile No.(s) | 9850122999 |
| Website | www.svct-shrigonda.com |
| College Code | 123118 |

SWAMI VIVEKANAND AYURVED MEDICAL COL. PARGAON

Dean/ Principal Stamp & Signature

PRINCIPAL
SWAMI VIVEKANAND AYURVED
MEDICAL COLLEGE & RESEARCH CENTER

6

विशेष–ध. आ./मुं. सा. वि./५० म.

क्रमांक

2 A

66

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा/५७९५/अ.नगर

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान श्रीगोंदा ता. श्रीगोंदा जि. अ.नगर खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख १४।८ ...... १९९८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

[signature]

संस्थांचे सहायक निबंधक,

अ.नगर विभाग.

5

विशेष/ध.आ./मु.सा.वि./२म.

2B

23

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये अहमदनगर येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामिण विकास सेवाभावी संस्था, [illegible] ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ ४६८० अहमदनगर

[illegible] यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक २८/१२/१९९८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही ... धर्मादाय आयुक्त

पदनाम ... अहमदनगर

परिशिष्ट "ब"

ज्ञापन

०१. संस्थेचे नाव -- "स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान".

०२. संस्थेचा पत्ता -- होले हॉस्पीटल, श्रीगोंदा.

०३. संस्थेचे उद्देश --

१. बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक शिक्षणांची सोय करणे व चालविणे. उच्च माध्यमिक विद्यालय, उच्च शिक्षण व महाविद्यालय चालविणे.

२. प्रौढ शिक्षण वर्ग, अंगणवाडी, रात्रशाळा शिक्षणांची सोय होणेस सुरु करणे व व्यवस्था पहाणे.

३. वैद्यकिय, अभियांत्रिकी, कृषि, आयुर्वेद, होमीओपॅथिक महाविद्यालय सुरु करणे व चालविणे. डी. एम. एल. टी, एम. एल. टी. नर्सिंग रुग्णसेविका यासारखे अभ्यासक्रम चालविणे. डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी, तंत्रनिकेत, कलानिकेतन, दंत महाविद्यालय अशा संस्था चालविणे.

४. आधाराश्रम, वृध्दाश्रम, महिलाश्रम, सुरु करणे व चालविणे.

५. संगणक प्रशिक्षण वर्ग सुरु करणे व चालविणे., तंत्र शिक्षण व प्रशिक्षण संस्था चालविणे. सर्व प्रकारचे व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था चालविणे.

६. बी. एड. डी. एड., एम. पी. एड., बी. पी. एड, शिक्षणांची सोय करणे व चालविणे. विद्यापिठांअंतर्गत चालणारे सर्व शैक्षणिक उपक्रम राबविणे व इतर सर्टिफिकेट कोर्स चालविणे.

७. गरीब व गरजु मुलांना शालेय गणवेश, वहया, पुस्तके व शालेय साहित्य पुरविणे.

८. ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिवण क्लास, भरतकाम, व पाकशास्त्र, टायपिंग, शॉर्टहॅण्ड याचे प्रशिक्षण देणे व सोयी व सुविधा पुरविणे.

९. ग्रामीण भागात महिलांना कुटुंब कल्याण व नियोजन, अंधश्रध्दा, हुंडाबंदी बालसंगोपन याचे प्रशिक्षण देणे व माहिती व साधने पुरविणे.

१०. राज्य शासन व केंद्र शासन यांच्या सर्व योजनांची माहिती देणे व योजना राबविणे व त्यास मदत करणे.

११. राज्य शासनाची झुणकाभाकर, ~~रॉकेल विक्री व स्वस्त धान्य दुकानाची~~ योजना सुरु करणे व राबविणे.

१२] अपंगशाळा, आश्रमशाळा व धर्मार्थ दवाखाना सुरु करणें व चालविणे.

१३] अद्यावत हॉस्पीटल बांधणें व त्यात सर्व प्रकारची वैदयकीय सुविधा उपलब्ध करुन देणे.

१४] विविध प्रकारची रोगनिदान शिबीरे आयोजित करणे. उदा- कर्करोग, मधुमेह, एडस्, दंत रोग, रक्तदान, नेत्रदान, नेत्ररोग इ.

१५] रुग्णांच्या सेवेसाठी रुग्णवाहीका चालविणे.

१६] ग्रामीण भागात लोकांना व मुलांना व्यसनमुक्ती व रोगमुक्ती, बालविवाह यापासुन मुक्त करणे व माहिती देणे.

१७] शेतक-यांना नवीन शेती पध्दतीची माहिती देणे व बि - बियाणे यांची माहिती देणे व पुरविणे.

१८] फळबाग, फुलबाग व शेतीतील उत्पन्न वाढविण्यास ~~शेती अवजारे पुरविणे~~ व प्रशिक्षण देणे, त्यांची माहिती देणे.

१९] पाणलोट क्षेत्र व जलसंधारण या योजनांची माहिती व योजना राबविणे.

२०] कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, शेळीमेंढी पालन व व्यवसायाचे प्रशिक्षण देणे व उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देणे.

२१] गाई, गुरे व जनावरांसाठी दवाखाना सुरु करणे व त्यात तज्ञ पशु डॉक्टरांची नियुक्ती करणे व जनावरांना रोगराई मुक्त करणेस औषधे व सुविधा पुरविणे.

२२] शेती उत्पन्न वाढविण्यास नवीन कलमे, बि- बियाणे खते व शेतीस आवश्यक अवजारे यांची माहिती देणे व प्रशिक्षण देणे

२३] वाचनालय सुरु करणे.

२४] सर्व जाती धर्माचे उत्सव आयोजित करणे.

०४. "स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान" या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे संस्थेची व्यवस्था विहीत झालेली आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची नावे, पत्ते, वय व व्यवसाय, हुद्दा, राष्ट्रीयत्व व धारण केलेले पद पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | पद | व्यवसाय | वय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ.श्री.होले भाऊसाहेब बबन<br>मेनरोड, श्रीगोंदा, जि.अ.नगर | अध्यक्ष | वैद्यकिय | २८ | भारतीय |
| ०२. | श्री. पोटे चंद्रकांत एकनाथ<br>कुकडी कॉलनी, श्रीगोंदा.<br>जि. अहमदनगर. | उपाध्यक्ष | नोकरी | ३९ | —"— |
| ०३. | श्री. घोलप लक्ष्मण बाबू<br>हनुमाननगर, श्रीगोंदा. | सचिव | नोकरी | ४० | —"— |
| ०४. | श्री. खेदे दिगंबर अर्जुन<br>शिवाजीनगर, श्रीगोंदा. | सहसचिव | धंदा | २६ | —"— |
| ०५. | श्री. शेख मुख्तार युसूफ<br>स्टेशनरोड, श्रीगोंदा. | खजिनदार | धंदा | २७ | —"— |
| ०६. | श्री. शेळके बबन दगडू<br>कुकडी कॉलनी समोर,श्रीगोंदा | सदस्य | कॉन्ट्रॅक्टर | ३८ | —"— |
| ०७. | श्री. मेहेर देवीदास वेदा<br>कुकडी कॉलनी समोर,श्रीगोंदा | सदस्य | नोकरी | ३७ | —"— |
| ०८. | श्री. काळे उल्हास तुकाराम<br>मु.पो. इनामगांव,ता. शिरुर,<br>जि. पुणे. | सदस्य | शेती | २८ | —"— |
| ०९. | सौ. डॉ. होले सुवर्णा भाऊसाहेब<br>मेनरोड, श्रीगोंदा. | सदस्य | वैद्यकिय | २५ | —"— |
| १०. | श्री. बोरा अभयकुमार मांगीलाल<br>मेनरोड, श्रीगोंदा. | सदस्य | धंदा | ३० | —"— |
| ११. | श्री. बोरुडे केशव फकिरा<br>कुकडी कॉलनी, आढळगांव,<br>ता. श्रीगोंदा. | सदस्य | नोकरी | ४१ | —"— |

०५. आम्ही खालील सह्या करणारे "स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान" या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान", श्रीगोंदा ही संस्था आज दि. १५.४.९८ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

०१. श्री. डॉ. होले भाऊसाहेब बबन

०२. श्री. पोटे चंद्रकांत एकनाथ

०३. श्री. घोलप लक्ष्मण बाबू

०४. श्री. बदे दिगंबर अर्जुन

०५. श्री. शेख मुख्तार युसुफ

०६. श्री. शेळके बबन दगडू

०७. श्री. मेहेर देवीदास येदा

०८. श्री. काळे उल्हास तुकाराम

०९. श्री. बोरा अभयकुमार मांगीलाल

१०. श्री. वोल्हे केशव फकिरा.

११. सौ. डॉ. होले सुवर्णा भाऊसाहेब

स्थळ : श्रीगोंदा.

दिनांक: २.५.९८

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो, त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

खरी प्रतिलिपि

१७-३-०३

## परिशिष्ट "क"

### नियम व नियमावली

**संस्थेचे नांव :** स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान, श्रीगोंदा.

०१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :

संस्था म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान असे समजले जाईल.

अध्यक्ष म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल.

उपाध्यक्ष म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल.

सेक्रेटरी म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे सचिव असे समजले जाईल.

सहसेक्रेटरी म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे सहसेक्रेटरी असे समजले जाईल.

खजिनदार म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे खजिनदार असे समजले जाईल.

कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजले जाईल.

सर्वसाधारण सभेचे सभासद म्हणजे स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान या संस्थेचे सर्वसाधारण सभेचे सभासद असे समजले जाईल.

०२. कार्यक्षेत्र :

०३. **हिशोबाचे वर्ष :**

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

०४. **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :**

१८ वर्षावरील वयाचे कोणत्याही भारतीय स्त्री अगर पुरुषास सभासदत्व प्राप्त करता येईल. त्याकरीता त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज भरावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सभासदत्वाची निर्धारित वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्याची नोंदणी संस्थेच्या सभासद यादीमध्ये करण्यात येईल.

०५. **सभासदाचे प्रकार :** सभासदाचे दोन प्रकार राहतील.

| | |
|---|---|
| आजीव सभासद | संस्थेच्या स्थापनेच्या काळात जे प्रथम कार्यकारी मंडळ असेल त्यास आजीव सभासद म्हणून समजण्यात येईल. आजिव सभासद फि. रु. ५०१ राहील. |
| साधारण सभासद | संस्थेला रु. १०१ फक्त वार्षिक वर्गणी देणा-या व्यक्तीला साधारण सभासद म्हणून समजण्यात येईल. |

०६. **सभासदत्व रद्द होणे :**

कोणताही सभासद कायदेशिर गुन्हेगार ठरला असेल, सभासद वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल, देश सोडून परदेशात गेला असेल, व्यसनी झाला असेल किंवा गैरवर्तणूकी करीत असेल किंवा संस्था नुकसान पोहचवित आहे असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य कारणावरुन कार्यकारी मंडळाचे बहुमताने ठराव मंजूर करुन काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल.

०७. **सर्वसाधारण सभा तिचे अधिकार आणि कार्ये :**

सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल. ही सभा वर्षातून एक वेळा तरी घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेवू शकतील. कार्यकारी मंडळाने पाठविले-

**०८. सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :**

सर्वसाधारण सभेची सूचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये, दिनांक, वेळ, स्थ व सभेचे विष्य नमूद करावे, सूचना सर्व सदस्यांना संस्थेच्या डाकबुकावर सहि घेवून देता येईल. अगर टपालाव्दारे पाठविली जाईल. सूचना [illegible] सभेच्या १० दिवस अगोदर पाठविणे. एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासद उपस्थित झाल्यास सभेची गणसंख्या पूर्ण झाली असे समजण्यात येईल. गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास स्थगित सभेला कोरमचे बंधन राहणार नाही. परंतू अशी टिप असणे आवश्यक राहील.

**०९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :**

अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. जी कार्य सर्वसाधारण सभ करू शकते ती सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला राह

**१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :**

संस्थेच्या कार्यकारी मंडळात ११ सदस्य राहतील त्यात पुढील पदाधिका--याचा समावेश राहील. अध्यक्ष -१, उपाध्यक्ष -१, सेक्रेटरी - १, सहसेक्रेटरी - १, खजिनदार - १ व अन्य कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.

**११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षाचा राहील. निवडणूकीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने/पॅनेल सर्वसाधारण सभेत बहुमताने दर पाच वर्षांनी निवड जातील. नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक होईपर्यंत जुने कार्यकारी मंड कामकाज पाहील.

**१२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :**

**अध्यक्ष** — सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवून नोटीस काढून सभा आयोजीत करणे, रकमेची देवाण घेवाण करणे इ.

**सेक्रेटरी :**

१. संस्थेच्या सभा बोलाविणे.
२. संस्थेचा पत्रव्यवहार करणे.
३. तक्रारीचे निवारण करणे.
४. संस्थेच्या कर्मचा-यांवर लक्ष ठेवणे.
५. किरकोळ नियम तयार करणे.
६. संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते कोर्ट कचेरीचे कामे करणे.
७. वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
८. रोजचे हिशोब पाहून त्यावर स्वाक्षरी करणे.
९. खर्चाची बिले मंजूर करणे.
१०. संस्थेच्या वतीने रकमेची देवाण घेवाण करणे.
११. संस्थेच्या मालमत्तेची देखरेख करणे.
१२. मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे.
१३. संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले इतर कोणतेही काम करणे.

**सहसेक्रेटरी :** सेक्रेटरी यास मदत करणे व त्यांच्या अनुपस्थितीत त्यांची कामे करणे.

**खजिनदार :**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब पलिहीणे अगर लिहून घेणे, हिशोब पूर्ण झाल्यानंतर संस्थेच्या कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, हिशोबाचे पुस्तकावरून वार्षिक पत्रके तयार करणे, रकमेची देवाण घेवाण करणे, ऑडिटर यांनी हिशोबातून काढलेल्या त्रुटींची पूर्तता करणे इ.

**कार्यकारी मंडळाचे सभासद :**

कार्यकारी मंडळाच्या सभेला व सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाणें, निवडणूकीचे वेळीस मतदान करणें व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

**इतर सभासद :**

सर्वसाधारण सभेत उपस्थित रहाणे, निवडणूकीचे वेळी मतदान करणें व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

## १३. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी तीन सभा घेण्यात येतील. संस्थेच्या कोणत्याही सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सेक्रेटरींनी कार्य कारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून १५ दिवसांचे आत बोलावण्याचे बंधन राहील. परंतू मागणी सभेच्या विषयात दिलेल्या बाबींशी कार्यकारी मंडळ सहमत असणे आवश्यक आहे. अशी सभा बोलावतांना सूचनेत मागणीचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

## १४. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना दोन दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमूद असावे, सूचना संस्थेच्या डाकबुकात सही घेऊन अथवा टपालाव्दारे पाठविण्यात येईल. कार्यकारी मंडळाचे ~~तीन~~ सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजले जाईल. 2/3 [signature]

## १५. कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :

कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविल त्याप्रमाणे राहतील. ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम बाकी येणे आहे अशा सभासदाला निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही व मतदान करण्याचा सुध्दा हक्क राहणार नाही.

## १६. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्या बाबत :

कोणत्याही कारणास्तव कार्यकारी मंडळातील पद/पदे रिक्त झाल्यास उरलेल्या कार्यकारी मंडळाच्या बहुमताने रिक्त पद/पदे भरता येईल.

## १७. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारांवर नियंत्रण ठेवील. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाची पूर्तता करील. संस्थेचे काम सुलभ रितीने चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करील. आवश्यकतेनुसार त्यात बदल करु शकेल व तसेच एखादया कार्याकरीता उपसमिती नियुक्त करु शकेल व त्यांचेकडून हिशोब तसेच वेळोवेळी माहिती घेव शकेल व कार्यसमाप्ती-

ती काढून घेणे, संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशिर बाबी पूर्ण करणे, हिशेबावर नियंत्रण ठेवणे, तक्रारीची दखल घेणे, कार्यकारी मंडळाचे रिक्त स्थान भरणे, सेवकांची नियुक्ती करणे, त्यांना काढून टाकणे व अन्य आवश्यक ती सर्व कामे करणे, बहुमताने मंजूर झालेले ठराव कायदेशिर करुन अंमलात आणणे.

१८. संस्थेचा निधी, विनियोग व मिळकत :

सभासद फि, देणगी, वर्गणी, अनुदान संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील. संस्थेच्या उद्देशपूर्तीकरीता निधी गोळा करता येईल व तो स्थावर स्वरूपाच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल. याकरीता कलम ३५ नुसार मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांची पूर्वपरवानगी घेऊन येईल. अशा मिळकतीची नोंद पब्लिक ट्रस्ट रजिस्टरमध्ये बदल अर्ज करुन करावी लागेल.

१९. उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतूद :

ज्या उद्देशाने रक्कम गोळा केली असेल त्या उद्देशांवर ती रक्कम १००% खर्च करता येईल. शैक्षणिक व सामाजीक ९०% व इतर उद्देश १०%.

२०. कर्ज किंवा यासंबंधी तरतूद :

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तिकडून किंवा शेडूल बँकेकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येतील. त्याकरीता मे. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांची कलम ३६ नुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

२१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्या बाबतची तरतूद :

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याचा अधिकार राहील. संस्थेला त्याकरीता कार्यकारी मंडळाची बहुमताने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापूर्वी मे. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांची कलम ३६ नुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

२२. बँक खाते :

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता असलेल्या शेड्यूल बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या तीन पदाधिकाऱ्यांचे पैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांचे संयुक्त सहिने रक्कम काढता येईल.

२३. सभासद यादी ठेवण्याची पध्दत :

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ नुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची सर्व यादी अनुसूची एकच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लावलेल्या व्यक्तिंच्या नोंदीसंबंधी ही अटी बाबतचे विवरण अनुसूची २ च्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

२४. नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :

संस्थेच्या नियम आणि नियमातील बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करून नियमावलीतील बदल करता येईल संस्था नोंदणी कायदा १८६० चे अधिनियम १२ नुसार कार्यवाही करण्यात येईल व याबाबतची मा. सहाय्यक संस्था निबंधक, अहमदनगर यांची मंजूरी घेणेत येईल.

२५. संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याबाबतची तरतूद :

संस्थेच्या नावात किंवा उद्देशातबदल करण्याचे झाल्यास अथवा दोन संस्थांचे विलीनिकरण करावयाचे असल्यास १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

२६. विसर्जन :

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेस मंजुरी द्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे घेणे बाबतचे व्यवहार पूर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक असलेली मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम चे कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

--- दा ख ला ---

असे प्रमाणित करण्यात येते की "स्वामी विवेकानंद शैक्षणिक व ग्रामीण विकास सेवाभावी प्रतिष्ठान", श्रीगोंदा या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री. डॉ. होले भाऊसाहेब बबन | अध्यक्ष. | [signature] |
| ०२. | श्री. पोटे चंद्रकांत एकनाथ | उपाध्यक्ष. | [signature] |
| ०३. | श्री. घोलप लक्ष्मण बापू | सेक्रेटरी | [signature] |

स्थळ - श्रीगोंदा.
दिनांक - २-५-९८

खरी प्रतिलिपी
[signature] 17-3-03
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय अ.नगर विभाग अ.नगर

# AHMEDNAGAR ZILLA PARISHAD
# AHMEDNAGAR

## FORM 'C'

*(See Rule - 5)*

*Certificate of Registration Under Section 5 of the Bombay Nursing Homes*

## Registration Act 1949

No. – 78/2022

This is to certify that Shri./Smt-. *~~Dr.~~ Swami Vivekanand Education & Rural Development Charitabale Trust, Shrigonda* has been requested under the Bombay Nursing Homes Registration Act. 1949, in respect of – *Swami Vivekanand Hospital & Ayurved Research Center* situated at/ po *Pargaon Tal- Shrigonda Dist- Ahmednagar - Swami Vivekanand Hospital & Ayurved Research Center* and has been authorized to carry on the said nursing home.

**Registration No. :- AH-433** **No. of Beds:-** 102

**Date of Registration. :- 03/01/2017**

**Place : Ahmednagar**

**Date of issue of Certificate :- 02/05/2022**

**This Certificate of registration shall be valid upto – 01/05/2023**

*( Dr. Sandeep Sangale. )*

**Signature of the registering authority**

District Health Officer

Zilla Parishad, Ahmednagar